International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor – 7.328
Vol.9 No.4 Mar – Apr 2022

# शाश्वत विकास आणि जलयुक्त शिवार अभियान: एक अभ्यास

**संजय अर्जुन लेंगरे**
*संशोधक विद्यार्थी,*
*राज्यशास्त्र अधिविभाग,*
*शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.*

**प्रस्तावना :**

शाश्वतता म्हणजे एखादी अवस्था जी थोड्या किंवा अनंत काळापर्यंत टिकून राहते एखाद्या समाजाची सांस्कृतिक व आर्थिक अवस्था टिकून राहणे याला शाश्वतता म्हणतात. तसेच पृथ्वीवरील नैसर्गिक स्रोतांचे संरक्षण व संवर्धन करणे याला शाश्वतता म्हणतात शाश्वततेची संकल्पना चार पैलुशी निगडीत आहे. पर्यावरणीय, आर्थिक, सामाजिक व संस्थात्मक शाश्वतता. या चारपैकी एखादी गोष्ट जरी दुर्लक्षित झाली तरी समाजाची प्रगती खुंटते किंवा समाजाच्या अस्तित्वाला धोका निर्माण होतो. महाराष्ट्रातील सर्व लोकांना स्वच्छ व मुबलक प्रमाणात पिण्यासाठी व शेतीसाठी पाणी मिळावे यासाठी महाराष्ट्र शासनाने जलयुक्त शिवार अभियान सुरू केले या अभियानाचा महत्वाचा उद्देश म्हणजे जमिनीतील पाणी साठयात वाढ करणे.

**अभ्यासाची उद्दीष्ट्ये:**

१) शाश्वत विकास आणि जलयुक्त शिवार अभियान यांचा सहसंबंध अभ्यासणे
२) जलयुक्त शिवार अभियानाची माहिती घेणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम माहिती स्रोतांचा वापर केला आहेयामध्ये विविध मासिके, वर्तमानपत्रे, संदर्भग्रंथ, इंटरनेटचा वापर केला आहे

**शाश्वत विकासाची ध्येये:**

जागतिक पातळीवर मानवी विकाससंबंधीचा केलेला प्रयत्न म्हणजे शाश्वत विकासाची ध्येये होत. मानवी आयुष्याच्या सर्व अंगाचा विचार करून तसेच पृथ्वीवरील विविध प्राणिमन्न आणि निसर्ग यांच्या संरक्षणासाठीचे महत्व लक्षात घेऊन या ध्येयांची रचना करण्यात आली शाश्वत विकास ध्येये ही जगातील सर्व प्रकारची गरीबी हटवण्यासाठी व एकसमान न्याय्य आणि सर्व व्यक्तीसाठी व पृथ्वीवर सुबत्ता आणणाऱ्या जगाच्या निर्मितीसाठी दूरदर्शी व वैश्विकमान्यतेची तत्वे आहेत. सन २०१५ मध्ये १९३ देशांनी १७ ध्येयांना मान्यता दिली आहे. ती खालीलप्रमाणे आहेत.

१) दारिद्रय निर्मूलन
२) भूक निर्मूलन
३) चांगले आरोग्य
४) दर्जेदार शिक्षण
५) लैंगिक समानता
६) शुद्ध पाणी आणि आरोग्यदायक स्वच्छता
७) नूतनीकरण करण्याजोगी आणि स्वस्त ऊर्जा
८) चांगल्या नोकऱ्या आणि अर्थशास्त्र
९) नवीन उपक्रम आणि पायाभूत सुविधा
१०) असमानता कमी करणे
११) शाश्वत शहरे आणि समाज
१२) उपलब्ध साधनांचा जबाबदारीपूर्वक वापर
१३) हवामानाचा परिणाम
१४) शाश्वत महासागर
१५) जमिनीचा शाश्वत उपयोग
१६) शांतता आणि न्याय
१७) शाश्वत विकासासाठी भागीदारी

**जलयुक्त शिवार अभियान:**

महाराष्ट्रात प्रामुख्याने शेती व्यवसाय केला जातो. परंतु पावसाच्या असमान वितरणाचा परिणाम शेती व्यवसायावर होत आहे. पाणी टंचाईची समस्या दूर करण्यासाठी तसेच शेती व पिण्यासाठी शाश्वत पाण्याची उपलब्धता होण्यासाठी जलयुक्त शिवार ही संकल्पना पुढे आली. भूजल पातळीत वाढ करण्यासाठी पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्याच्या हेतूने महाराष्ट्र शासनाने ५ डिसेंबर २०१४ रोजी जलयुक्त शिवार अभियान सुरू करण्याचा निर्णय घेतला.

**जलयुक्त शिवार अभियानाचा उद्देश:**

१) पावसाचे पाणी गावाच्या शिवारातच अडविणे.

२) जमिनीतील पाणी पातळीत वाढ करणे.

३) महाराष्ट्राला २०१९ पर्यंत पाणी टंचाईतून मुक्त करणे.

४) सिंचन क्षेत्रात वाढ करणे.

५) शेतीसाठी संरक्षित पाणी व पाण्याच्या वापराच्या कार्यक्षमतेत वाढ करणे.

६) महाराष्ट्रातील सर्व लोकांना पुरेशा पाण्याची शाश्वतता देणे.

७) विकेन्द्रित पाणी साठे निर्माण करणे.

८) बंद पडलेल्या पाणी पुरवठा योजनांचे पुनर्जीविकरण करणे.

**जलयुक्त शिवार अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी यंत्रणा:**

१) विभागीय स्तरावर विभागीय आयुक्ताच्या अध्यक्षतेखाली समन्वय समिती.

२) जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समन्वय समिती.

३) तालुका स्तरावर उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती.

**शाश्वत विकास आणि जलयुक्त शिवार अभियान सहसंबंध**

शाश्वततेच्या प्रमुख पैलूपैकी पर्यावरणीय पैलू हा महत्वाचा आहे शाश्वत विकासाच्या ध्येयामध्ये एक महत्वाचे ध्येय म्हणजे सर्वांसाठी पाणी व स्वच्छता यांची उपलब्धता व शाश्वत व्यवस्थापन याची सुनिश्चिती करणे. या ध्येयाप्रमाणे सर्वांना स्वच्छ व मुबलक प्रमाणात पाणी मिळाले पाहिजे हा उद्देश समोर ठेऊन जलयुक्त शिवार अभियान महाराष्ट्रात सुरू करण्यात आले

जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत महाराष्ट्रात केलेली कामे

१) पाझर तलाव, लघुसिंचन तलाव दुरुस्ती

२) जुन्या जलसंरचनांचे पुनर्जीवन

३) कोल्हापूर पद्धतीच्या व साठवण बंधाऱ्याची दुरुस्ती

४) सिमेंट नालाबांध खोलीकरण व रुंदीकरण

५) छोटे ओढे/नाले जोड प्रकल्प राबविणे

६) विहीर/बोअर पुनर्भरण, पिण्याच्या पाण्याचे स्रोत तसेच पाणीवापर संस्थांचे बळकटीकरण

७) कालवा दुरुस्ती

**जलयुक्त शिवार अभियानात अशासकीय संस्था व लोकसहभाग:**

सर्वप्रथम संपूर्ण महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त जिल्ह्यातील एकूण जलस्रोताची माहिती गोळा करण्यात आली. लहानमोठे तलाव, नाले, ओढे, नद्या, ओहळ इत्यादी माहिती प्रशिक्षित लोकाकडून गोळा करण्यात आली. यामध्ये काम करताना गावकऱ्यांचे श्रमदान, आर्थिक सहभाग तसेच स्वयंसेवी संस्थांचा सहभाग यांच्या मदतीने या अभियानाचे कामकाज नियोजनपूर्वक सुरू झालेयामध्ये उद्योग क्षेत्रातील टाटा ट्रस्ट, पाणी फाऊंडेशन, भारतीय जैन संघटना, कमलनयन बजाज फाऊंडेशन, श्री साई संस्थान, आर्ट ऑफ लिविंग, सकाळ वृत्तपत्र समूह विविध शाळा महाविद्यालय यांनी सहभाग घेतला.

**जलयुक्त शिवार अभियानात झालेले काम:**

जलयुक्त शिवार अभियानाबाबत लोकामध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी गावोगावी जलदिंडया काढण्यात आल्या. या अभियानातून लोकांना जलयुक्त शिवार अभियानाचा उद्देश समजवण्यात आला. या अभियानातून नदी, नाले, ओढे यांचे खोलीकरण, रुंदीकरण, साखळी सिमेंट नालाबांध, जुन्या लघु पाठबंधाऱ्याची दुरुस्तीओढे नाले जोडप्रकल्प, धरणातील गाळ उपसा इत्यादी कामे गावकऱ्यांच्या मदतीने केली गेली. राज्यात २०१५ ते २०१८ या तीन वर्षाच्या कालावधीमध्ये १६५११ गावामध्ये जलयुक्त शिवाराची विविध कामे हाती घेण्यात आली. त्यावर फेब्रुवारी २०१८ पर्यंत ६२३० कोटी ७६ लाख रु. खर्च झाले त्यातील ३३ टक्के खर्च सिमेंट नालाबांधावर आणि १३ टक्के खर्च नदी नाले खोलीकरणावर करण्यात आला. जलयुक्त शिवार ही लोकचळवळ बनल्यामुळे या योजनेत लोकांनी ५८३ कोटी ७८ लाख रुपयांचा सहभाग नोंदवला. शासनाने पुरवलेल्या माहितीच्या आधारे जोसेफ समितीने गावोगावी कामाची स्थिती काय आहे याची चाचपणी करण्यासाठी भेटी दिल्या. बहुतांशी गावामध्ये केलेल्या कामाची स्थिती चांगली असल्याच्या नोंदी समितीच्या सदस्यांनी केल्या आहेत. बहुतांशी शेतकऱ्यांनी पाणी उपलब्ध झाल्याने पिकाचे उत्पादन वाढल्याचे सांगितले.

**सारांश:**

महाराष्ट्र शासनाने 'सर्वांसाठी पाणी टंचाई मुक्त महाराष्ट्र- २०१९' हे उद्दीष्ठ डोळयासमोर ठेवून टंचाई परिस्थितीवर मात करण्यासाठी 'जलयुक्त शिवार अभियान' ही योजना राबविली. या योजनेला महाराष्ट्रात चांगला प्रतिसाद मिळाला असून या अभियानातून नदी नाले, ओढे यांचे खोलीकरण, रुंदीकरण इत्यादी कामे शासकीय, अशासकीय संस्था, लोकसहभागातून झाली. जलयुक्त शिवार अभियान काही बाबतीत यशस्वी झाले असले तरी अजून बरीच कामे होणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील शेती ही पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्यामुळे पावसाच्या विषम वितरणाचा शेतीवर प्रतिकूल परिणाम होतो. त्यामुळे शाश्वत शेतीसाठी आणि पिण्याच्या पाण्यासाठी

जलसिंचनाची आवश्यकता आहे. पिण्याचे शुद्ध व मुबलक पाणी मिळण्यासाठी अजून प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यासाठी अनेक गैरशासकीय संस्थांची मदत घेणे आवश्यक आहे तरच शाश्वत विकासासाठीच्या ध्येयापर्यंत पोहचता येईल.

**संदर्भ:**


१) अर्थसंवाद २०१८ नोव्हेंबर-डिसेंबर

२) सकाळ ॲग्रोवन २५ फेब्रु २०१६

३) लोकराज्य ऑगस्ट २०१५

४) योजना जुलै २०१६

५) www.wikipedia.com